## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची मंगळवार दि.०९/२/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२४ वी बैठक मंगळवार दि.९.२.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. प्रकाश पाठक | उपसचिव, म.शा. |
| ३) | श्री. जी.डी. जयस्वाल | सहमुख्य अधिकारी |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ६) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ७) | मा. श्री. हेमराज शहा | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ९) | मा. श्री. व्ही.जी.नायर | सदस्य |
| १०) | मा. श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ११) | मा. श्री.शरद शिरिषकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १३) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १४) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १५) | मा.श्री.नंदकुमार काळे | सदस्य |
| १६) | सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | कार्यकारी अभियंत/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १८) | श्री. अनिल देशमुख, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री. देशमुख यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, शासनाचे प्रतिनिधी उपसचिव श्री. फाटक व अधिका-यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : १२४/१**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.०३.२.२०१० रोजी झालेल्या १२३ व्या बैठकिचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ७ वर सादर करण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी सूचना केली की, मुख्य अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे संक्रमण शिबीरातील गाळयात राहणा-या रहिवाशांची माहिती फलकावर लावण्याची कार्यवाही मार्च-२०१० पर्यंत पूर्ण करण्यात येईल अशी नोंद करण्यात यावी तसेच बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबत पाठपुरावा चालू ठेवावा व मंडळाच्या प्रलंबित विषयासंबंधी मा. राज्यमंत्री महोदयांबरोबर बैठक आयोजित करावी. त्यांनी अशीही सूचना केली की, मागील बैठकीत श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा उपस्थित नसल्यामुळे कलम ३३(७) खाली ना हरकत प्रमाणपत्राव्दारे पुनर्विकसित झालेल्या इमारतीतील अतिरिक्त गाळे बृहतसूचीवरील गाळेधारकांना वितरीत करण्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती मिळू शकली नव्हती ती आजच्या बैठकीत देण्यात यावी. यावर श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा यांनी माहिती दिली की, उपसमितीच्या अहवालानुसार संबंधित नस्ती मा. मुख्य अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आली होती व चर्चेत मा. मुख्य अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबतच्या खुलाश्यासह पुन्हा मा. मुख्य अधिकारी यांचेकडे नस्ती दोन दिवसांत सादर करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी सूचना केली की, उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासास ना हरकत प्रमाणपत्र देताना रहिवाशाचे सलग बाजूबाजूचे दोन गाळे असल्यास व कागदपत्र उपलबध असतील व पात्र असतील तर त्या रहिवाशास दोन वेगवेगळे गाळे देण्याबाबत मार्गदर्शक सूचनांमध्ये तसा बदल करण्याबाबत पत्र दिले असून त्याचा विचार व्हावा.

वरील सविस्तर चर्चेअंती मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करण्याची नोंद घेऊन कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---

**बाब क्रमांक १२४/२**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीतील रिक्त असलेले निवासी / अनिवासी गाळे खुल्या बाजारात विक्री करणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.९ वर सादर करण्यात आला आहे.

मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, विषयांकित प्रकरणी ११६ व्या बैठकीत बाब क्र.१४ अन्वये चर्चा होऊन ठराव क्र. ९६५ सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. सदर ठरावानुसार गाळे विक्रीसाठीचे धोरण मंजूर झाल्यानंतर जाहीरतीचा मसुदा मंजूर करण्यात आला होता परंतु श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांनी असे निदर्शनास आणले की, " प्रथम येईल त्यास प्रथम गाळा " तत्वावर गाळे देण्याचे

ठरविल्यास प्रथम कोण यावरच वाद निर्माण होतील व तशी तरतुदही नाही. म्हणून " प्रथम येईल त्यास प्रथम गाळा " तत्वावर गाळे विक्री न करता सदर धोरणात सुधारणा करुन " प्रथम येईल त्यास प्रथम गाळा " या ऐवजी एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास " सोडत पध्दतीने " गाळयांची विक्री केली जाईल. तसेच उपरोक्त मंडळाच्या व प्राधिकरणाच्या ठरावामध्ये सदरहू विक्री करावयाच्या गाळयाची किंमत निवासीकरिता रेडीरेकनरच्या ४०% व अनिवासी करिता रेडीरेकनरच्या ७५% अशी ठरविली आहे. तथापि यापैकी काही इमारती ब-याच जून्या असल्यामुळे गाळे जाहीरातीनंतरही विना विक्री राहिल्यास प्राधिकरणाचा ठराव क्र.६०४२, दि. २९.७.२००४ नुसार निवासीकरिता रु.१५००/- व अनिवासी करिता रु.३०००/- प्रति चौ.फू. दराने विक्री करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे व त्यानुसार सुधारित प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

-------------------oo----------------

**बाब क्रमांक १२४/३**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

------------------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.११ ते ३३ व ९९ ते १३३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी खालील दहा पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रकरणी ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.३१०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१०२ दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.८, फ-उत्तर, लक्ष्मी नारायण रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९ येथील **'संगीत ज्योती'** इमारत.
२. भुकर पहाणी क्र.२५९-ई/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३२१-ई दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.३४ - फ-उत्तर, डॉ. बा. आंबेडकर मार्ग, माटुंगा, मुंबई-४०० ०१९, **'उत्तम व्हीला'** इमारत.
३. भुकर पहाणी क्र. ३२२/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१२१ दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.३१ फउ एच.सी.रोड क्र.१९, स्कीम क्र.६, रोड क्र.३, माटुंगा (पु), मुंबई-४०० ०१९ **'सुरज भुवन'**.
४. भुकर पहाणी क्र. ९३६, माहीम विभाग, इमारत क्र.११३ ग-उत्तर, वीर सावरकर मार्ग, माहीम, मुंबई-४०० ०१६ **'जावेद मंझील'**.

५. भुकर पहाणी क्र. ७/२०१, अंतिम भुखंड क्र.३८ टी.पी.एस-४, माहीम विभाग, इमारत क्र.४ व ४-४ई, ग-उत्तर डॉ.डीसील्वा रोड, दादर (प), मुंबई-४०० ०२८ **'जढाव भुवन'**.

६. भुकर पहाणी क्र.३४०-गीरगाव विभाग, इमारत क्र.३५-डी/१५-१७, डी, मुगभाट क्रॉस लेन, गीरगाव, मुंबई-४०० ००४.

७. भुकरं पहाणी क्र.३४३-गीरगाव विभाग, इमारत क्र.३५-डी-९, उपकर क्र. डी/५९२, तात्या घारपुरे पथ, मुगभाट क्रॉस लेन, गीरगाव, मुंबई-४०० ००४, 'म्हात्रे बील्डीन्ग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८. भुकर पहाणी क्र.४८७ फोर्ट विभाग - उपकर क्र. अे-१७१६ (बी) इ.क्र.१७-१७अे नादिरशा सुखीया स्ट्रीट, फोर्ट मुंबई-४०० ००१ येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९ भुकर पहाणी क्र.३५७-ताडदेव विभाग, इ.क्र.८, उपकर क्र.डी/३८०८(१०), वाडीया स्ट्रीट, मुंबई-३४ 'बेन कुवर मॅन्शन' मुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१० भुकर पहाणी क्र.१६१-सी/१०, १६१-डी/१० व १६१-ई-/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१६२-सी, १६२-डी व १६२-ई दादर माटुंगा इस्टेट इ.क्र.८०, ८२ व ८४-८४-अे, उपकर क्र.फउ/७१२४ (१सी), फउ/७१२४ (१डी) फउ/७१२४ (१ई-एफ), वीन्सेन्ट रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९ 'पुनीत स्मृती', 'मीनाक्षी' व 'मोहन मनोर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

मा. सदस्य श्री.बशीर पटेल यांनी सूचना केली की, ना.ह.प्र.पत्राव्दारे पुनर्विकासाची कामे तातंतडीने करण्यात येतात परंतु दुरुस्तीची कामे तांतडीने करण्यात येत नाहीत. त्यांच्या मतदारसंघातील इमारतीकडे मंडळाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत त्यांनी तक्रार केली. यावर मा. सदस्य श्री.हरिष सणस यांनी सूचना केली की, त्यांची सूचना एका इमारतीच्या संदर्भात विषय असल्यामुळे त्यांनी कार्यसूचीवरील चालू असलेले विषय पूर्ण झाल्यानंतर त्यांनी त्यांचा विषय मांडावा.

<u>ठराव क्रमांक : १२४ /१०३२</u>

मुंबई बेटावरील खालील १० मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भुकर पहाणी क्र.३१०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१०२ दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.८, फ-उत्तर, लक्ष्मी नारायण रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९ येथील **'संगीत ज्योती'** इमारत.

२ भुकर पहाणी क्र.२५९-ई/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३२१-ई दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.३४ - फ-उत्तर, डॉ. बा. आंबेडकर मार्ग, माटुंगा, मुंबई-४०० ०१९, **'उत्तम व्हीला'** इमारत.

३ भुकर पहाणी क्र. ३२२/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१२१ दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.३१ फउ एच.सी.रोड क्र.१९, स्कीम क्र.६, रोड क्र.३, माटुंगा (पु), मुंबई-४०० ०१९ **'सुरज भुवन'**.

४ भुकर पहाणी क्र. ९३६, माहीम विभाग, इमारत क्र.११३ ग-उत्तर, वीर सावरकर मार्ग, माहीम, मुंबई-४०० ०१६ **'जावेद मंझील'**.

५ भुकर पहाणी क्र. ७/२०१, अंतिम भुखंड क्र.३८ टी.पी.एस-४, माहीम विभाग, इमारत क्र.४ व ४-४ई, ग-उत्तर डॉ.डीसील्वा रोड, दादर (प), मुंबई-४०० ०२८ **'जढाव भुवन'**.

६ भुकर पहाणी क्र.३४०-गीरगाव विभाग, इमारत क्र.३५-डी/१५-१७, डी, मुगभाट क्रॉस लेन, गीरगाव, मुंबई-४०० ००४.

७ भुकर पहाणी क्र.३४३-गीरगाव विभाग, इमारत क्र.३५-डी-९, उपकर क्र. डी/५९२, तात्या घारपुरे पथ, मुगभाट क्रॉस लेन, गीरगाव, मुंबई-४०० ००४, 'म्हात्रे बील्डीन्ग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८ भुकर पहाणी क्र.४८७ फोर्ट विभाग - उपकर क्र. अे-१७१६ (बी) इ.क्र.१७-१७अे नादिरशा सुखीया स्ट्रीट, फोर्ट मुंबई-४०० ००१ येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९ भुकर पहाणी क्र.३५७-ताडदेव विभाग, इ.क्र.८, उपकर क्र.डी/३८०८(१०), वाडीया स्ट्रीट, मुंबई-३४ 'बेन कुवर मॅन्शन' मुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१० भुकर पहाणी क्र.१६१-सी/१०, १६१-डी/१० व १६१-ई-/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१६२-सी, १६२-डी व १६२-ई दादर माटुंगा इस्टेट इ.क्र.८०, ८२ व ८४-८४-अे, उपकर क्र.फउ/७१२४ (१सी), फउ/७१२४ (१डी) फउ/७१२४ (१ई-एफ), वीन्सेन्ट रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९ 'पुनीत स्मृती', 'मीनाक्षी' व 'मोहन मनोर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

**<u>बाब क्रमांक १२४/४</u>**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-१ मधील** (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) ३६ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.३५ ते ४३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-१ः अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभागातील ३६ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.५,७९,९३,१३६/- व निव्वळ रक्कम रु. ३,१२,०९,३७७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक :१२४ / १०३३</u>**

परिमंडळ-१ः अे,बी,सी-१,सी-२,सी-३विभागातील ३६ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार

विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.५,७९,९३,१३६/- व निव्वळ रक्कम रु. ३,१२,०९,३७७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/५ (१)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) १९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.४५ ते ४९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत. **परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) १९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.५,६०,२८,०५६ /- व निव्वळ रक्कम रु. २,७५,१७,५२१ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०३४**

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) १९ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.५,६०,२८,०५६ /- व निव्वळ रक्कम रु. २,७५,१७,५२१ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/५ (२)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) १४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.५१ ते ५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) १९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,४४,१२,११९/- व निव्वळ रक्कम रु. १,८४,१०,३०३ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०३५**

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) १४ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,४४,१२,११९/- व निव्वळ रक्कम रु. १,८४,१०,३०३ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/६**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) १७ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.५७ ते ६१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती **परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) १७.उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. ३,२१,३७,६०७/- व निव्वळ रक्कम रु.१,४६,०५,६८५ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक :१२४ / १०३६

**परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) १७ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. ३,२१,३७,६०७/- व निव्वळ रक्कम रु.१,४६,०५,६८५ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

बाब क्रमांक १२४/७

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) १ इमारत.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६३ ते ६५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती **परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) १ .उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२९,७८,७८३ /- व निव्वळ रक्कम रु.१२,५४,०२९/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक :१२४ / १०३७

**परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) १ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२९,७८,७८३ /- व निव्वळ रक्कम रु.१२,५४,०२९/- प्रदान

करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/८**

विषय- इमारत क्रमांकः ६२-७०, ग्रँट रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाला मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेवरील रक्कमेस प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- लागू करुन प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६७ ते ७१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत. चर्चेअंती इमारत क्रमांकः ६२-७०, ग्रँट रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाला मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेवरील रक्कमेस प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- लागू करुन प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत. सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०३८**

इमारत क्रमांकः ६२-७०, ग्रँट रोड या इमारतीस रु.१२००/- पेक्षा जास्त होणारी रक्कम रु. १,७६,६००/- च्या खर्चास रु.२०००/- प्रति चौ.मी. प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आधीन राहून करण्यास मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/९**

विषय- इमारत क्रमांकः २२५-, एफ रंगारी चाळ, ना.म.जोशी मार्ग, परिमंडळ-२.या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाला मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेवरील रक्कमेस प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- लागू करुन प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७३ ते ७७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

**ठराव क्रमांक :१२४ / १०३९**

इमारत क्रमांकः २२५-, एफ रंगारी चाळ, ना.म.जोशी मार्ग, परिमंडळ-२ या इमारतीच्या रु.१८३६/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त होणारी रक्कम रु.१,२७,६८७/- च्या खर्चास

रु.२०००/- प्रति चौ.मी.प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आधीन राहून करण्यास मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/१०**

विषय- इमारत क्रमांकः २२५-,सीडी, ना.म.जोशी मार्ग, परिमंडळ-२.या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाला मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेवरील रक्कमेस प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- लागू करुन प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७९ ते ८१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

**ठराव क्रमांक :१२४ / १०४०**

इमारत क्रमांकः २२५२२५-,सीडी,ना.म.जोशी मार्ग, परिमंडळ-२ या इमारतीच्या रु.१८५५.३७/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त होणारी रक्कम रु.२,५६,६३२/- च्या खर्चास रु.२०००/- प्रति चौ.मी.प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आधीन राहून करण्यास मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/११**

विषय- इमारत क्रमांकः ४१-४३, चौपाटी सी-फेस रोड, परिमंडळ-२. .या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाला मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेवरील रक्कमेस प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- लागू करुन प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.८३ ते ८७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

**ठराव क्रमांक :१२४ / १०४१**

इमारत क्रमांकः ४१-४३, चौपाटी सी-फेस रोड, परिमंडळ-२ या इमारतीच्या रु.१८१९.१४/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त होणारी रक्कम रु.४,०५,९८९/- च्या खर्चास रु.२०००/- प्रति चौ.मी.प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आधीन राहून करण्यास मंजूरी देण्याचे व

कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/१२**

विषय- **उपमुख्य अभियंता (परिमंडळ-२)** मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी बाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.८९ ते ९३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाबाबत श्री. सेहगल, उ.मु.अभियंता यांनी माहिती दिली की, त्यांच्या अखत्यारितील जी/साऊथ विभागात प्रॉपिंगचे काम चालू असून सदर काम करणारे सध्याची जी एजन्सी आहे ती बदलून नव्याने वार्षिक कॉन्ट्रॅक्ट मिळण्याचा प्रस्ताव मजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

चर्चेअंती सर्वानुमते प्रशासकिय मंजुरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०४२**

**उपमुख्य अभियंता (परिमंडळ-२)** मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामास रु. ६,२४,३२४/- इतक्या रक्कमेस प्रशासकिय मंजुरी सर्वानुमते देण्यात आली. व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२४/१३**

विषय- **उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१)** मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी बाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.९५ ते ९७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाबाबत श्री. लोहकरे, उ.मु.अभियंता,परिमंडळ-१यांनी माहिती दिली की, ए,बी,सी-२सी-३ विभागाचे रु.४६,००३६५/- चे प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती प्रशासकिय मंजुरी सर्वानुमते देण्यात आली.

ठराव क्रमांक :१२४ / १०४३

**उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१)** मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामास रु. ४६,००,३६५/- इतक्या रक्कमेस प्रशासकिय मंजुरी सर्वानुमते देण्यात आली. व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

मा. सदस्य श्री.बशीर पटेल यांनी अशी तक्रार केली की, उमरखाडी येथील एक इमारत कोसळली होती त्या इमारतीबाबत तसेच ईस्त्राइल मोहल्ला व बंगालीपूरा येथे हल्ली जी इमारत पडली त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे ? निधी मंजूर होऊनही १५-१५ वर्षे वर्षे इमारतीची दुरुस्ती करण्यात येत नाही. त्यामुळे रहिवाशांना हालअपेष्टा सहन करावी लागते. यावर श्री. लोहकरे, उ.मु.अभियंता यांनी माहिती दिली की, सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या व काम सुरु होणार होते. परंतु त्याचवेळी ही इमारत कोसळली व उर्वरित इमारतीची दुरुस्ती लवकरच करण्यात येणार आहे. यावर खुलासा करताना श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांनी माहिती दिली की, ईस्त्राइल मोहल्ला या इमारतीचे वाटप करण्यासाठी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आली होती परंतु एकही अर्ज प्राप्त झाला नाही. परत दुस-यांदा जाहीरात देण्यात येईल व जाहीरातीस जर प्रतिसाद मिळाला नाही तर एकतर्फी सोडत काढून रहिवाशांना गाळे वितरीत करण्यात येतील.

यावर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्या शासनाने नेहमीच रहिवाशांच्या हिताचे निर्णय घेतलेले आहेत. अपघातग्रस्तांना तांतडीने आर्थिक मदत उपलब्ध करुन देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. इमारत कोसळल्यानंतर मंडळाचे संबंधित अधिकारी त्वरित घटनास्थळी पोहोचले/पोहोचतात व रहिवाशांना संक्रमण शिबीरात स्थलांतरित करण्यापासून आवश्यक ती सर्व मदत केली/करतात.

मा. सदस्य श्री.हेमराज शहा यांनी " मुंबई समाचार " या वृत्तपत्रात मंडळाच्या २६,००० इमारती धोकादायक आहेत अशी बातमी प्रसिध्द झाली आहे असे निदर्शनास आणून खरा आकडा किती आहे हे कळून येत नाही. त्यामुळे एकूण किती इमारती आहेत, त्यापैकी किती दुरुस्त झाल्या, किती पुनर्विकसित झाल्या याची यादी देण्यात यावी. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी सविस्तर माहितीची सी.डी. मा. सदस्यांना लवकरच देण्यात येईल. मा.सदस्यांना पाहिजे असलेली माहिती त्या सी.डी.मधून मिळेल असे त्यांनी निदर्शनास आणले.

व्हेकेशन नोटीसचे तयार करण्यात आलेले दोन रंगातील नमुने सर्व मा. सदस्यांना दाखविले असता मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी तयार करण्यात आलेले दोन रंगातील नमुने चांगले आहेत असे मत मांडले तर मा. सदस्य श्री.हेमराज शहा यांनी काळया रंगाऐवजी निळा रंग वापरुन शिलाई केलेली व्हेकेशन नोटीस असावी अशी सूचना केली.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी मा. सदस्यांच्या सूचनेनुसार व्हेकेशन नोटीस तयार करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना दिल्या. सदर प्रस्ताव पुढील बैठकीत मंजूर झाल्यानंतर १ एप्रिल २०१० पासून निर्णयाची अंमलबजावणी करणे शक्य होईल असेही त्यांनी सूचित केले.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, पूर्वी लिकेज, गटार लाईन खराब झाली असल्यास, पाण्याचा पाईप तुटला असल्यास किंवा अन्य काही तक्रारी आल्यास कामे होत होती. परंतु आता कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आल्यानंतर पूर्वीप्रमाणे कामे होत नाहीत. तक्रार केल्यानंतर महिना होऊन गेला तरी कार्यवाही केली जात नाही. दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत आहे. दुरुस्तीची कामे पूर्वीप्रमाणेच गतिमान व्हावीत अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी त्यांनाही काही ठिकाणी अशाचप्रकारचा अनुभव आला असून अधिका-यांना सूचना दिल्या की, कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या भागातील पुनर्रचित इमारती, किंवा पुनर्रचना विभागाकडे पूर्वी चालू असलेली कामे याबाबत त्यांनी अद्याप पूर्ण माहिती घेतलेली नाही. जो कोणी नवीन कार्यकारी अभियंता आहे त्यांनी आपल्या विभागातील पूर्वीची पुनर्रचित इमारतींची काय कामे होती, किंवा पुनर्रचित इमारती कोणत्या होत्या किंवा एखाद्या ठिकाणी संक्रमण शिबीर असतील तर त्यांची तसेच संपादित जमिनीच्या विकासाची कामे काय आहेत इत्यादी सर्व कामांबाबत पूर्वीच्या संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा करुन कामांची माहिती करुन घ्यावी व दुरुस्तीच्या कामांबरोबरच पुनर्रचित गाळे व संक्रमण शिबीरासंबंधीच्या कामावर नियंत्रण ठेवावे / आवश्य ती कार्यवाही करावी.

मा. सदस्य श्री. हरिष सणस यांनी असे निदर्शनास आणले की, संक्रमण शिबीरात जे फॉर्म वाटप करुन भरुन घेण्यात येत आहेत त्यास काही लोकांचा प्रतिसाद चांगला आहे तर काही लोकांचा विरोध आहे. लोकांमध्ये विशेषतः सायन प्रतिक्षा नगर येथील लोकांमध्ये या मोहीमेबाबत संभ्रम असून त्यांना अशी भिती वाटते की, त्यांनी अर्ज भरुन दिले तर त्यांना घराबाहेर काढण्यात येईल. म्हणून लोकांना या मोहीमे बाबत माहिती देण्यात यावी असे वाटते.

याच विषयाबाबत मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, सायन प्रतिक्षा नगर संक्रमण शिबीरात हया सर्वेस विरोध करण्यात येत असल्याचे त्यांच्या पक्षाच्या काही कार्यर्त्यांनी त्यांना सांगितले असता त्यांनी त्यांना समजावून सांगितले की, हया सर्वेस प्रतिसाद देऊन सर्वेअंतर्गत फॉर्म भरुन देण्यामध्ये रहिवाशांचे भवितव्य असून

नियमितीकरणाबाबत विचार होऊ शकतो. रहिवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी सदर कार्यकर्त्यांनी विनंती केली आहे. रहिवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी काही सदस्य व अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यास ते तयार आहेत. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी या मोहीमेबाबत त्यांनादेखील दूरध्वनी आले. काहींनी प्रत्यक्ष भेटी घेतल्या असता संबंधितांना सदर मोहीमेबाबत माहिती देण्यात आल्यानंतर ते समाधानी झाले असे निदर्शनास आणले. बिंबीसार नगर, सायन प्रतिक्षा नगर, वांद्रे व कन्नमवार नगर या ठिकाणी मोहिमेस विरोध होत आहे. मा. आमदार बाबा सिध्दीकी, मा. आमदार श्री. मंगेश सांगळे मा.खासदार श्री.गायकवाड साहेब, मा.खासदार श्री. संजय निरुपम, मा.ना.वर्षाताई गायकवाड, मा. जगन्नाथ शेट्टी , मा. आमदार श्री. वायकर व त्या त्या भागाचे काही नगरसेवक हया सर्वांचे फोन आल्यानंतर त्यांना समजावून सांगितल्यानंतर त्या सर्वांनी सदर मोहीमेस सहकार्य करण्याबाबत सहमती दर्शविली आहे. बहुतेक ठिकाणचा विरोध संपलेला असून या मोहिमेतून मिळालेल्या माहितीवर कशाप्रकारे कार्यवाही करावी याबाबत सर्वांना विश्वासात घेऊन पुढे काय कार्यवाही करावयाची हे ठरविता येईल अशी त्यांनी सूचना केली आहे. सुमारे १६००० अर्ज येणे अपेक्षित असून आतापर्यंत सुमारे ७ हजार अर्ज आलेले आहेत. लोकांवर दबाव न आणता शांतपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाने अर्थसंकल्पात अपघातग्रस्तांना रु.२५ लाखाची मदत करण्यासाठी जी तरतुद केली होती व धोरण ठरवले होते ते प्राधिकरणाने नामंजूर केले आहे. यावर मा. सदस्यांनी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत अपघातग्रस्तांना रु.२५ लाखाचे आर्थिक सहाय्य तांतडीने उपलब्ध होण्यामागे मंडळाच्या सदस्याच्या भावना /विचार प्राधिकरणासमोर योग्यप्रकारे मांडून प्रस्ताव मंजूर करुन घेण्याबाबत मा. मुख्य अधिकारी यांना सूचना केली.

मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट यांनी एम.आय.जी.क्लबचे सभासदत्व मिळणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता सचिव श्री. देशमुख यांनी माहिती दिली की, मुंबई मंडळाच्या सदस्यांना आजीवन सदस्यत्व मिळालेले नसून तात्पुरती ' सर्विस मेंबरशीप ' मिळाली आहे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, नवीन सदस्य होण्यासाठी मार्च-२०१० पासून फॉर्म उपलब्ध होणार आहे असे समजते. यावर मा. सदस्यांनी सदस्यत्वासाठीचे शुल्क भरण्याची तयांची तयारी असून या शुल्कामध्ये काही सवलत मिळाल्यास प्रयत्न करावा अशी विनंती केली.

काही प्रस्ताव आजच्या बैठकीत वेळे अभावी घेता येत नसल्यामुळे आजची बैठक स्थगित करुन पुढील आठवडयात बैठक घेण्याची सूचना काही सदस्यांनी केली. चर्चेअंती बैठक तहकुब करुन तहकुब बैठक मंगळवार दि. १६.२.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. घेण्याचे ठरले.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्वांचे आभार मानून बैठक तहकुब केल्याचे जाहीर केले.

-------------------------oo-------------------------

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२४ वी तहकुब बैठक मंगळवार दि.१६.२.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात पुन्हा सुरु झाली. सदर बैठककीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. प्रकाश पाठक, | उप सचिव, म.शा. |
| ३) | श्री. जी.डी. जयस्वाल, | सहमुख्य अधिकारी |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ६) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ७) | मा. श्री. हेमराज शहा | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ९) | मा.श्री. सईद खान | सदस्य |
| १०) | मा.श्री. हरिष सणस | सदस्य |
| ११) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १२) | मा.श्री. व्ही.जी. नायर | सदस्य |
| १३) | मा.श्री. शरद शिरिषकर | सदस्य |
| १४) | मा.श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| १५) | मा.श्री. बशीर पटेल | सदस्य |
| १६) | मा.श्री. सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १७) | सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १८) | कार्यकारी अभियंत/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १९) | श्री. अनिल देशमुख,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री. देशमुख यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, शासनाचे प्रतिनिधी उपसचिव श्री. फाटक व अधिका-यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने तहकूब झालेल्या १२४ बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : १२४/१४**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील प्रस्तावित मुळ/सुधारीत दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

परिमंडळ-१ मधील (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) २० इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.११५ ते १२१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती **परिमंडळ-१ मधील** (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) विभागातील एकूण २० उपकरप्राप्त इमारतींच्या संरचात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,४१,२२,२१४/- व निव्वळ रक्कम रु.१,९७,५०,९२९ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०४४**

**परिमंडळ-१ मधील** (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) विभागातील एकूण २० उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,४१,२२,२१४/- व निव्वळ रक्कम रु.१,९७,५०,९२९ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

.................................................................................

**बाब क्रमांक : १२४/१४ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील प्रस्तावित मुळ/सुधारीत दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

परिमंडळ-३ मधील (ई-१, ई-२, फ-दक्षिण) २५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१२३ ते १२९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-३ मधील (ई-१, ई-२, फ-दक्षिण) विभागातील एकूण २५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,६९,७४,५१०/- व निव्वळ रक्कम रु.२,१०,४४,९५८ /- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०४५**

परिमंडळ-३ मधील (ई-१, ई-२, फ-दक्षिण) विभागातील एकूण २५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,६९,७४,५१०/- व निव्वळ रक्कम रु.२,१०,४४,९५८ /-प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक : १२४/१५**

124
16/2/2015

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत भाडेकरूंना देण्यात येणाऱ्या अतिरिक्त क्षेत्रफळासाठी दर निश्चित करण्यासंबंधी.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

मा. मुख्य अधिकारी यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती दिली की, सन २००४ साली अतिरिक्त क्षेत्रफळासाठी निवासी गाळयासाठी रु.१५००/- व अनिवासी गाळयासाठी रु. ३०००/- किंमत आकारण्यात आली होती. तसेच भाडेकरु/रहिवाशांच्या देय क्षेत्रफळाच्या अधिक/ अतिरिक्त क्षेत्रफळासाठी सदर किंमत आकारण्यात येत असते. नाहरकत प्रमाणपत्रांतर्गत उपलब्ध होणा-या व वितरीत केलेल्या सदनिकांच्या अतिरिक्त क्षेत्रफळासाठी ६ वर्षांपूर्वी ठरविलेली रक्कम न आकारता यापुढे त्यामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यानुसार निवासी गाळयासाठी रु.३०००/- व अनिवासी गाळयासाठी रु. ६०००/- किंमत आकारण्यात यावी असा प्रस्ताव सादर करण्यात आल आहे. यावर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, आजचा बांधकाम खर्च निवासी गाळयासाठी रु.१५०० ते २०००/- चालू आहे त्यापेक्षा जास्त नाही. म्हणून जून्या दरामध्ये वाढ करण्यात येऊ नये. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ना.ह.प्र.पत्रांतर्गत गाळयासाठी केवळ बांधकाम खर्च न घेता मंडळास काही उत्पन्न मिळावे म्हणून वाढ प्रस्तावित केली आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांच्या मताशी मा.सदस्य श्री.किसन जाधव सहमती दर्शविली व सहा वर्षांपूर्वी अतिरिक्त क्षेत्रफळासाठी बांधकाम खर्च घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. रेडी रेकनरमध्ये झालेली वाढ लक्षात घेता जून्या दरामध्ये जास्त वाढ न करता निवासी

गाळयाकरिता प्रति चौ.फू. रु.१५००/- ऐवजी प्रति चौ.फू.रु.२०००/- व अनिवासी गाळयाकरिता प्रति चौ.फू. रु.५०००/- दर करण्यास हरकत नाही अशी सूचना सदस्यांनी केली. सविस्तर चर्चेअंती निवासी गाळयाकरिता रु.२०००/- व अनिवासी गाळयाकरिता रु.५०००/- प्रति चौ.फू.दर ठरविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व त्याप्रमाणे प्रस्तावात सुधारणा करण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक :१२४ / १०४६</u>**

मंडळाच्या ११६ व्या बैठकीत ठराव क्र.९६५ अन्वये " प्रथम येईल त्यास प्रथम गाळा " या तत्वावर गाळे विक्री करण्याचे ठरविण्यात आले होते त्यात बदल करुन एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास सोडत पध्दतीने गाळयांची विक्री करण्याचे एकमताने ठरले.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत भाडेकरूंना देण्यात येणाऱ्या अतिरिक्त क्षेत्रफळासाठी दि. १.४.२०१० पासून निवासी गाळयाकरिता रु.२०००/- व अनिवासी गाळयाकरिता रु.५०००/- प्रति चौ.फू. दर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व त्याप्रमाणे प्रस्तावात सुधारणा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता सुधारित प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूर करण्याकरिता सादर करण्यात यावा असे एकमताने ठरले.

---

**<u>बाब क्रमांक : १२४/१६</u>**

विषय- इ.क्र.अे.आर.पी.बिल्डींग १, २ व ३ नौशीर भरूचा मार्ग 'डी' विभाग, सी.एस.क्र.१/२७८ ताडदेव विभाग नवीन चिखलवाडी, ताडदेव, मुंबई ४००००७ च्या पुनर्रचनेबाबत - सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे मत मांडले की, नवीन चिखलवाडी, ताडदेव येथील इमारतीची पुनर्बांधणी क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत करण्यात यावी. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी काही रहिवाशी सतत येऊन त्यांच्या इमारतीची पुनर्रचना तांतडीने करण्याबाबत विनंती करीत आहेत. आतापर्यंत १३३ रहिवाशांपैकी ८८ रहिवाशांना पुनर्रचित गाळे वाटप करण्यात आले आहेत. व आता उर्वरित रहिवाशांना ३०० चौ.फू.चे गाळे दिल्यास भेदभाव

होणार आहे. त्यामुळे प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती करण्यात आली. यावर मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, तेथे सुमारे म्हाडाचे ५५० गाळेधारक आहेत ते सुमारे १२० चौ.फू., १४० चौ.फू. १६० चौ.फू. च्या गाळयामध्ये रहात आहेत. .अे.आर.पी.बिल्डींगमध्ये जे ४५ गाळेधारक आता शिल्लक आहेत त्यांच्यासाठी पुनर्रचित इमारत बांधण्याचा वेगळा विचार न करता ५५० गाळेधारकांबरोबर घेऊन त्या सर्वांचा एकत्रित विचार करण्यात यावा व क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये सदर ४५ गाळेधारकांचा समावेश करणे संयुक्तिक होईल व ते रहिवाशी सहभागी होतील असे वाटते. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, ३३-७ कलमांतर्गत जॉईंट व्हेंचरखाली पुनर्बांधणी करण्याचे धोरण शासन स्तरावर मान्यतेसाठी प्रस्तावित असून सदर धोरण निश्चित झाल्यावर जर पुनर्बांधणी योजना त्याखाली घेता आली तर तो प्रस्ताव मंजूर करणे शक्य होईल. व तोपर्यंत प्रस्ताव प्रलंबित ठेवावा लागेल. सर्व मा. सदस्यांनी ३३-७ कलमांतर्गत जॉईंट व्हेंचरखाली पुनर्बांधणी करण्याचे धोरण निश्चित होईपर्यंत आजच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची सूचना केली.व सर्वानुमते ती मान्य करण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०४७**

३३-७ कलमांतर्गत जॉईंट व्हेंचरखाली पुनर्बांधणी करण्याचे धोरण निश्चित होईपर्यंत इ.क्र.अे.आर.पी.बिल्डींग-१,२ व ३ नौशीर भरूचा मार्ग 'डी' विभाग, सी.एस.क्र.१/२७८ ताडदेव विभाग नवीन चिखलवाडी, ताडदेव, मुंबई ४०००0७ च्या पुनर्रचनेबाबतचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यास सर्वानुमते परवानगी देण्यात आली. .

---

**बाब क्रमांक : १२४/१७**

विषय- इ.क्र.४१५-४२१ "गिरधर भुवन" डॉ.डी.बी.मार्ग मुंबई या इमारतीच्या दुरुस्तीबाबत - ८८ (३)(अ) प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन चर्चेअंती इ.क्र.४१५-४२१ "गिरधर भुवन" डॉ.डी.बी.मार्ग मुंबई या इमारतीच्या दुरुस्तीबाबत - ८८ (३)(अ) प्रमाणपत्र रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली

**ठराव क्रमांक :१२४ /१०४८**

इ.क्र.४१५-४२१ "गिरधर भुवन" डॉ.डी.बी.मार्ग मुंबई या इमारतीच्या दुरुस्तीबाबत - ८८ (३)(अ) प्रमाणपत्र रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक : १२४/१८**

विषय- इ.क्र.१०८-१०८अे, बोरा बाझार स्ट्रिट, मुंबई या इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८ (३) (अ) च्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३७ ते १३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे

विषयांकित प्रस्तावावर चर्चा होऊन चर्चेअंती इ.क्र.१०८-१०८अे, बोरा बाझार स्ट्रिट, मुंबई या इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८ (३) (अ) च्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०४९**

इ.क्र.१०८-१०८अे, बोरा बाझार स्ट्रिट, मुंबई या इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८ (३) (अ) च्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक : १२४/१९**

विषय- उपमुख्य अभियंता परिमंडळ-१ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकियं मंजुरी प्रदान करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१४१ ते १४७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती परिमंडळ-१ मधील सी-१ विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या रु.१२,२७,९३२/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**ठराव क्रमांक - १२४/१०५०**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-१ मधील सी-१ विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या कामाच्या रु.१२,२७,९३२/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

**बाब क्रमांक - १२४/३**

विषय- मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१४९ते १७५ व १८५ ते १९१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी उपरोक्त ८ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

मा. मुख्य अधिकारी यांनी भूकर पाहणी क्र. भुकर पहाणी क्र.७१०, ७११ व ७१२ गिरगाव विभाग च्या प्रस्तावाबाबत असे निदर्शनास आणले की, निओ बिल्डर्सच्या नावाने सदर प्रस्ताव आला आहे. निओ फर्म मालक नसून मालक वेगळा आहे. मालकाला ना हरकत प्रामणपत्र देणे बंधनकारक आहे. पार्टनरशिप फर्म स्थापन करुन जर प्रस्ताव आला तरी ती फर्म मालक होत नाही. त्या कंपनीला विकास करण्याचे अधिकार मालकाने देणे आवश्यक आहे व या अटीवरच सदर नाहरकत प्रमाणपत्रांचे प्रस्ताव मंजूर करण्यात यावेत अशी विनंती केली. मा. मुख्य अधिकारी यांच्या या मताशी सर्व मा. सदस्यांनी सहमती दर्शवून पार्टनरशिप फर्मला जमिन मालकाकडून पुनर्विकास करण्याचे अधिकार दाखल करण्याच्या अटीवर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

मा. संदस्य श्री. हेमराज शहा यांनी भुकर पहाणी क्र.२७५, मलबार हिल विभाग, इ.क्र.१३४, उपकर क्र. डी/२४९५(१), वाळकेश्वर रोड बाबत असे निदर्शनास आणले की, वाळकेश्वर मुंबई- ४०० ००८ दाखविण्यात आले आहे ते चुकीचे असून वाळकेश्वर मुंबई नं. ०८ मध्ये येत नाही व त्याप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी काही प्रस्तावांची सहपत्रे इंग्रजी भाषेतून दिलेली आहेत ती का देण्यात आली आहेत अशी विचारणा केली व यापुढे इंग्रजी भाषेतून प्रस्ताव न

आणता मराठी भाषेतून आणावा अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी सर्व अधिका-यांनी मराठी भाषेतूनच प्रस्ताव सादर करणे अपेक्षित असताना इंग्रजी भाषेतून प्रस्ताव सादर न करता मराठी भाषेतूनच प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मा. सदस्यांच्या सूचनेनुसार सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

| | |
|---|---|
| १. | भुकर पहाणी क्र.८/६३५, अंतिम भुखंड क्र.२२२-टी-पी-एस-३, माहिम विभाग. इमारत क्र. १४६, टी. एच. कटारीया मार्ग, माहिम, मुंबई-१६ येथील 'अमरनाथ भुवन'. |
| २. | भुकर पहाणी क्र.७०७/१० व ७०७-अे/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५७९ दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.६१ व ६१-अे, जामे जमशेठ रोड, माटुंगा, मुंबई-१९, 'दुलीप दर्शन' व 'हेम ज्योती'. |
| ३. | भुकर पहाणी क्र.७१०, ७११ व ७१२ गिरगाव विभाग इ.क्र.८१-८३ मणी भवन, पारसीवाडा पहिली गल्ली, इ.क्र.७९ परमार बिल्डिंग, खेतवाडी मेन रोड आणि इ.क्र.७५-७७ वर्मा बिल्डिंग, खेतवाडी मेन रोड, मुंबई. |
| ४. | भुकर पहाणी क्र.२७५, मलबार हिल विभाग, इमारत क्र.१३४, उपकर क्र. डी/२४९५(१), वाळकेश्वर रोड, मुंबई - ४०० ००८ येथील 'भाटीया बील्डीन्ग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ५. | भुकर पहाणी क्र.३१९ माझागांव विभाग, उपकर क्र. इ-५८५४-५५, १२६/१२८/१३० मातार पखाडी रोड, माझगांव, मुंबई- ४०० ०१० येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ६. | भुकर पहाणी क्र.३६९८, भूलेश्वर विभाग - उपकर क्र. सी-७२५५ इ.क्र.१०१-१११, बारा इमाम रोड, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ७. | भुकर पहाणी क्र. १९०४, १९०३ व १९०२, मांडवी विभाग - उपकर क्र. बी-२२७८-८०, बी-२२७७, बी-२२७६ इ.क्र.१०३-१०७, १०९, १११-१११अे, इब्राहिम रहमतुल्ला मार्ग, मुंबई-४०० ००९ येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ८. | भुकर पहाणी क्र.३११ गिरगाव विभाग, उपकर क्र. डि-४४(१) इ.क्र.१६८ डि वैद्यवाडी ठाकूरद्वार मुंबई-४०० ००२ येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |

**ठराव क्रमांक : १२४/१०५१**

मुंबई बेटावरील खालील ८ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व भूकर पाहणी क्र. क्र. भुकर पहाणी क्र.७१०, ७११ व ७१२ गिरगाव विभाग च्या प्रस्तावाबाबत असा निर्णय घेण्यात आला की, पार्टनरशिप फर्मने जमिन मालकाकडून पुनर्विकास करण्याचे अधिकार दाखल करण्याच्या अटीवर प्रस्तावास मंजूरी देण्यात आली व भुकर पहाणी क्र.२७५, मलबार

हिल विभाग, इ.क्र.१३४, उपकर क्र. डी/२४९५(१), वाळकेश्वर रोड मुंबई नं. ०८ मध्ये येत नाही व त्याप्रमाणे प्रस्तावात सुधारणा करण्यात यावी. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| १ | भुकर पहाणी क्र.८/६३५, अंतिम भुखंड क्र.२२२-टी-पी-एस-३, माहिम विभाग. इमारत क्र. १४६, टी. एच. कटारीया मार्ग, माहिम, मुंबई-१६ येथील 'अमरनाथ भुवन'. |
| २ | भुकर पहाणी क्र.७०७/१० व ७०७-ओ/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५७९ दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.६१ व ६१-अे, जामे जमशेठ रोड, माटुंगा, मुंबई-१९, 'दुलीप दर्शन' व 'हेम ज्योती'. |
| ३ | भुकर पहाणी क्र.७१०, ७११ व ७१२ गिरगाव विभाग इ.क्र.८१-८३ मणी भवन, पारसीवाडा पहिली गल्ली, इ.क्र.७९ परमार बिल्डिंग, खेतवाडी मेन रोड आणि इ.क्र.७५-७७ वर्मा बिल्डिंग, खेतवाडी मेन रोड, मुंबई. |
| ४ | भुकर पहाणी क्र.२७५, मलबार हिल विभाग, इमारत क्र.१३४, उपकर क्र. डी/२४९५(१), वाळकेश्वर रोड, मुंबई - ४०० ००८ येथील 'भाटीया बील्डीन्ग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ५ | भुकर पहाणी क्र.३१९ माझागांव विभाग; उपकर क्र. इ-५८५४-५५, १२६/१२८/१३० मातार पखाडी रोड, माझगांव, मुंबई- ४०० ०१० येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ६ | भुकर पहाणी क्र.३६९८, भूलेश्वर विभाग - उपकर क्र. सी-७२५५ इ.क्र.१०१-१११, बारा इमाम रोड, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ७ | भुकर पहाणी क्र. १९०४, १९०३ व १९०२, मांडवी विभाग - उपकर क्र. बी-२२७८-८०, बी-२२७७, बी-२२७६ इ.क्र.१०३-१०७, १०९, १११-१११अे, इब्राहिम रहमतुल्ला मार्ग, मुंबई-४०० ००९ येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |
| ८ | भुकर पहाणी क्र.३११ गिरगाव विभाग, उपकर क्र. डि-४४(१) इ.क्र.१६८ डि वैद्यवाडी ठाकूरद्वार मुंबई-४०० ००२ येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. |

**बाब क्रमांक : १२४/२०**

विषय- उपमुख्य अभियंता परिमंडळ-२ मधील डी-१ विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या रु.३,४४,८५८/- अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याबाबत.

-----------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १७७ ते १८३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे

**ठराव क्रमांक - १२४/१०५२**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-१ मधील डी-१ विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या रु. ३,४४,८५८/- अंदाजपत्रकास प्रशासकीय

मंजूरी प्रदान करण्याबाबत मान्यता देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक - १२४/२१**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील ग/उत्तर विभागातील इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे .

---

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.१८५ ते १८७ वर सादर करण्यात आला.

चर्चेअंती परिमंडळ-परिमंडळ-४ मधील ग/उत्तर विभागातील १ इमारतीच्या संरचात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२८,३२,३२६/- व निव्वळ रक्कम रु.१८,०५,५३०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२४ / १०५३**

परिमंडळ-परिमंडळ-४ मधील ग/उत्तर विभागातील १ इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२८,३२,३२६/- व निव्वळ रक्कम रु.१८,०५,५३०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी असे निदर्शनास आणले की, बी.वॉर्ड, सी.वॉर्ड ई.वॉर्ड, डी.वॉर्ड विभागातील ब-याचशा इमारती अतिशय धोकादायक झालेल्या अहेत. त्यातल्या काही इमारतींचा काही भागच दुरुस्त करण्यात येतो. ठेकेदारांना पैसे न मिळाल्यामुळे बरीचशी दुरुस्तीची कामे बंद पडलेली आहेत. त्यांनी अशी सूचना केली की, रहिवाशांच्या जिवीताचा प्रश्न असल्यामुळे धोकादायक इमारतीची काही भागाची दुरुस्ती न करता संपूर्ण इमारत पाडून पुनर्रचित करण्यात यावी. यावर मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तसे करावयाचे झाल्यास निधी उपलब्ध होणे गरजेचे आहे.

व आहे त्याच निधीमध्ये वाढ होत नाही. म्हणून क्लस्टर डेव्हलपमेंटचा पर्याय शासनातर्फे उपलब्ध आहे. परंतु त्यामध्ये उपकरप्राप्त इमारतीचा समावेश होत नाही असे दिसून येते.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असा मुद्दा मांडला की, मंडळाच्या संक्रमण शिबीरांमध्ये अनेक अनधिकृत दुकाने झालेली आहेत. हा प्रकार नवीन संक्रमण शिबीरांच्या बाबतीत होऊ नये म्हणून संक्रमण शिबीरातील रहिवाशांसाठी मंडळातर्फे सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सहकार तत्वावर धान्य दुकान, भाजीची दुकाने, औषधांसाठी केमिस्ट इत्यादी दुकानांची व्यवस्था करण्यात यावी. मंडळाच्या मालमत्तेचे संरक्षण होण्याकरिता कडक अंमलबजावणी करण्याची गरज असून संकमण शिबीरामध्ये इतर कोणत्याही अनधिकृत दुकानांना परवानगी देण्यात येऊ नये व म.न.पा. जर अशा दुकानांना परवानगी देत असेल तर म.न.पा. ला सुध्दा अशी परवानगी न देण्याबाबत सांगण्यात यावे. त्यांनी अशीही सुचना केली की, नविन संक्रमण शिबीराबाबत मंडळाचे अधिकारी देखील काही योजना तयार करीत असतील तर त्याचीही त्यांना माहिती देण्यात यावी.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांच्या मताशी सहमती दर्शवून मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी अशी सूचना केली की,यापुढे गिरणीच्या जमिनीवर मिळणा-या संक्रमण शिबीरात व पुनर्विकसित संक्रमण शिबीरात तेथील रहिवाशांसाठी जीवनावश्यक वस्तू उपलब्ध होण्यासाठी वेगवेगळी दुकाने व वेलफेअर सेंटरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. व तशी तरतुद करण्यात यावी. एक हजार गाळयांसाठी वा पाचशे गाळयांसाठी किती दुकाने असावीत याबाबत तरतुद करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट यांनी अशी तक्रार केली की, एका भाडेकरुस सन १९७४ साली व्हेकेशन नोटीस देण्यात आली होती. त्यांचे ॲनेक्चरमध्ये देखील नाव आहे. तरीदेखील जून्या इमारतीच्या ठिकाणी बांधलेल्या नवीन इमारतीत त्यांना जागा देण्यात आलेली नाही. अशाप्रकारे त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. आता मुळ भाडेकरु व त्याची पत्नी दोघेही मृत पावले आहेत. सदर बाब अतिशय गंभीर असून याबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी त्वरित कार्यवाही करावी अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी सदर प्रकरणी योग्य तो निर्णय त्वरित घेण्यात येईल असे सांगितले.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असा मुद्दा मांडला की, संक्रमण शिबीरातील रहिवाशांकडून मागील दोन महिन्यांपासून भाडे गोळा करण्यात येत नाही रहिवाशी भाडे भरण्यास तयार आहेत परंतु भाडे घेण्यास कोणी नाही. सर्वेच्या कामामुळे जर सदर काम थांबविण्यात आले असेल तर आता सर्वे पूर्ण झालेला आहे. याच कामासाठी कार्यकारी अभियंता, उप अभियंता लावलेले असल्यामुळे पावसाळापूर्व सर्वेक्षणाचे काम आता लवकरच हाती घ्यावे लागणार आहे. त्या कामासाठी सदर अभियंतावर्ग उपलब्ध असणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, पावसाळापूर्व सार्वेक्षणात धोकादायक इमरतींची पाहणी अभियंत्यांमार्फत केली जाते. जर हे अभियंते संक्रमण शिबीर सर्वेच्या

कामात गुंतलेले असतील व वेळीच धोकादायक इमारतीची पाहणी झाली नाही व एखादी धोकादायक इमारत कोसळली असे होता कामा नये. कारण या कामासाठीसुध्दा वेळ लागतो हे लक्षात घेऊन संक्रमण शिबीर सर्वेच्या काम संपले असल्यास त्वरित अभियंत्यांना त्या कामातून मुक्त करावे.

यावर मा. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रतिक्षा नगर येथील सर्वेचे काम सोडता इतर संक्रमण शिबीरांचे सर्वेचे काम संपत आल्यामुळे सर्व संबंधित अधिका-यांना सूचना देण्यात आल्या आहेत की, शुक्रवार पासून या कामासाठी घेण्यात आलेल्या कर्मचारी/अधिका-यांना त्यांच्या मुळ कार्यालयात कामासाठी सोडण्यात यावे. यामध्ये काही त्यांना अडचण असल्यास त्यांनी मा. मुख्य अधिकारी यांच्याशी संपर्क करावा अशाही सूचना देण्यात आल्याचे सांगितले.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी अशी सूचना केली .डिझॅस्टर मॅनेजमेंट बाबतचे पुस्तक अपडेट करुन त्याची नवीन प्रत देण्यात यावी. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळाची नव्याने पुनर्रचना झालेली असल्यामुळे त्याबाबतची माहिती व इतर काही माहिती अपडेट करावयाची राहून गेली असल्यास ती सर्व माहिती घेऊन नवीन प्रत तयार करण्याच्या सूचना सचिव यांना दिल्या.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव / मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ